# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १५.०४.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १४.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये २८ केसेसमध्ये व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये एकूण २९ इसमावर कारवाई करून एकुण ७,९२,५७५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६०५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६६,८००/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— हद्पार ईसमास अटक.**

दिनांक १४.०४.२०२६ चे १२.३५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिति मिळाली की, पाचपावली पहिले फाटक, शोभाखेत, नागपुर येथे राहणारा हद्यपार इसम नामे आशिष पांडुरंग दिवटे वय ४३ वर्ष हा आपले राहते घरी आलेला आहे. अशा सुचनेवरुन त्याचे राहते घरी गेले असता, तो पोलीसांना पाहुन पळताना दिसुन आला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आशिष पांडुरंग दिवटे असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०५/२०२६, तामील दिनांक २२.०१.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावलीयेथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे मानकापूर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०४.२०२६ चे ०४.१५ वा. ते ०४.३० चे दरम्यान, फिर्यादीचे भाऊ नामे संतोष सुरेश इंगोले वय ३४ वर्ष रा. कस्तुरबा नगर, गल्ली क्र. ५, जरीपटका, नागपूर हे त्यांचे पॅशन प्रो मोटरसायकल क्र. एमएच ४९ एम ९०६६ ने अवस्थी चौकाकडुन शफीनगर पुलाकडे जात असता पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत अवस्थीनगर, हल्दीराम शोरुमसमोर एका तिनचाकी मालवाहक महिंद्रा चॅम्पियन अल्फा गाडी क्र. एमएच ३१ डीएस ०५५९ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन

फिर्यादीचे भावाचे मोटरसायकलला समोरुन धडक देवुन पळुन गेला. जखमी फिर्यादीचे भावाला उपचाराकरीता मेयो रूग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी दिनेश सुरेश इंगोले वय ४३ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३७, आर्यनगर, पुअर पिपल सोसायटी, कोराडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे मपोउपनि प्रांजली आंबेडकर ७०२०३२९३६७ यांनी तिनचाकी मालवाहक चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०४.२०२६ चे १२.३० वा. ते दिनांक १४.०४.२०२६ चे १६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, प्लॉट नं. ७७, भगीरथ पार्क, जगताप ले आऊट, महाजनवाडी, हिंगणा रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी मनोज केशवराव धनविजय वय ५० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह आजारी सास—यांना बघण्याकरीता चंद्रपूर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीमधील रोख ९४,००० रु., सोन्याचे वेगवेगळे दागिने व ओनिडा टिव्हीचे पार्ट असा एकुण किंमती २,२४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे मपोउपनि. रेशमा सरगल ७१३०३६२७६० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक १४.०४.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, मेडीकल हॉस्पिटल, वार्ड क्र. ४, चे जवळील प्रतिक्षालयात एक अनोळखी इसम वय अंदाजे ५० ते ५५ वर्ष वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, कॅज्युल्टी येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नसून वर्णन पुढीलप्रमाणे आहे. वर्णन :— रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची ५ फुट ७ इंच, दाढी मिशीचे केस वाढलेले व काळेपांढरे, अंगात जांभळी लाल रंगाचे फुलशर्ट, शर्टचे आत पांढरी सॅन्डो बनियान, काळया रंगाचा फुलपॅन्ट व आत निळया रंगाची अंडरविअर घातलेली असे आहे.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि परमेश्वर आगासे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**